अमरावती, बुधवार दिनांक २८ मार्च २००७

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

हिंदुस्थान

# शहरात लवकरच वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाला प्रारंभ

## वास्तूशास्त्र हे एक विज्ञान : डॉ. अहिरराव

अमरावती दि. २७ (प्रतिनिधी)

वास्तूशास्त्राची पौराणिक, अध्यात्मिक पार्श्वभूमी असून, ते एक विज्ञान आहे. त्या आधारे कुठल्याही प्रकारच्या वास्तूतील दोष हे विनासायास दूर करता येवू शकतात, असा विश्वास प्रख्यात वास्तूशास्त्रज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांनी व्यक्त केला.

स्थानिक श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात आर. के. ग्रुप कंपनी (मॅट्रीक्स - ईबाईक्स) तर्फे वास्तूशास्त्र विषयावरील कार्यक्रमासाठी शहरात आले असता डॉ. अहिरराव पत्रकारांशी चर्चा करीत होते. यावेळी त्यांनी शहरात लवकरच वास्तूशास्त्र विषयावरील अभ्यासक्रमाला प्रारंभ होत असल्याची माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, मानवी जीवनातील प्रत्येक गोष्टीवर वास्तूशास्त्राचा प्रभाव पडतो. यावर उपाय म्हणून मनुष्य फेंगशुईचे प्रयोग करुन पाहतो. परंतु हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या आपल्या



वास्तूशास्त्राकडे दुर्लक्ष करतो. नेमकी ही बाब लक्षात घेऊन गेल्या १३ वर्षांपासून पत्नी मंजुश्री अहिरराव सोबत वास्तूशास्त्र क्षेत्रात कार्यरत असून, आतापर्यंत १४ हजार पेक्षा जास्त वास्तूंबाबत मार्गदर्शन करुन नागरिकांना फायदा मिळवून दिल्याचे डॉ. रविराज अहिरराव यांनी सांगितले व वास्तूशास्त्राबाबत लोकांना ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी देशातील अग्रगण्य अशी डॉ. रविराज वास्तू स्पिरीचुअल सर्व्हिस व वास्तू एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन संस्था स्थापन केल्याचे ते म्हणाले. या संस्थेचा मुख्य उद्देश भारतीय वास्तूशास्त्राला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न आहे. संस्थेबाबत माहिती देताना डॉ. अहिरराव पुढे म्हणाले की, या संस्थेचे कार्यालय ठाणे आणि पुणे येथे असून वीस प्रशिक्षित वास्तू तज्ञ येथे काम करीत ही एक मोठी उपलब्धी आहे. या संस्थेमार्फत देश - विदेशात वास्तूशास्त्राबाबत मार्गदर्शन करण्यात येते. नुकताच या संस्थेला वास्तूशास्त्र प्रशिक्षणातील देशातील सर्वोत्तम पुरस्कार हैद्राबाद येथे प्रदान करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अमरावती, अकोला, यवतमाळ, नागपूर सहीत राज्यातील २५ जिल्ह्यात लवकरच सुरु होत, असलेल्या अभ्यासक्रमाबाबत माहिती देताना ते पुढे म्हणाले की, सहा महिने कालावधीचा हा अभ्यासक्रम असून, अभ्यासक्रमात विना तोडफोड उपाययोजनांच्या प्रशिक्षणासह, केस स्टडीज, प्रोजेक्ट रिपोर्टच्या माध्यमातून परीपूर्ण वास्तूतज्ञ तयार करणे आदी

(उर्वरित पान २ वर)

# वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाला लवकरच सुरवात

अमरावती, ता. २८ : मानवी जीवनावर प्रत्येकच वेळेस वास्तुशास्त्राचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे आपल्या घरात शास्त्रदोष राहिले असतील, तर ते दूर करणे आवश्यक आहे, असे प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांनी सांगितले.

वास्तुशास्त्राचे शास्त्रशुद्ध धडे अमरावतीच्या नागरिकांना देखील गिरविण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. लवकरच येथे वर्गाला सुरवात होणार आहे. विशेष म्हणजे आपण कोणतीही तोडफोड न करता वास्तुदोष दूर करू शकतो, असा दावा त्यांनी केला. वास्तू कशीही असली, तरी कोणताच फरक पडत नाही, हा विचार चुकीचा आहे. आपल्या जीवनात घडणाऱ्या बारीकसारीक घटनांवर त्याचा परिणाम होत असतो, असे त्यांनी येथील 'हॉटेल गोकुल'मध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितले.

डॉ. रविराज अहिरराव व मंजूश्री अहिरराव गेल्या १३ वर्षांपासून वास्तुशास्त्रक्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आजवर १४ हजारपेक्षा अधिक वास्तू निर्माणकार्यात मार्गदर्शन केले. राज्यातील अनेक मोठ्या कंपन्यांच्या कारखान्यांचे वास्तुदोष निवारण्यासोबतच अनेक कारखान्यांच्या निर्मितीतदेखील त्यांचे मार्गदर्शन घेतले जाते. विशेष म्हणजे, डॉ. रविराज अहिरराव यांनी काल (ता. २७) अमरावतीच्या संत ज्ञानेश्वर नाट्यगृहात 'वास्तुरविराज' हा नाट्यप्रयोग सादर केला. या प्रयोगाच्या माध्यमातून त्यांनी वास्तुशास्त्राचे महत्त्व अनेक उदाहरणे देऊन पटवून सांगितले. वास्तुशास्त्राचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना आपण 'वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन'ची स्थापना केली. आज आपले अनेक विद्यार्थी देश-विदेशात कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. अमरावतीत लवकरच या अभ्यासक्रमाला सुरवात होणार आहे.